Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Email: divsec.kop@gmail.com

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 2226
दिनांक :- ११/०६/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय:- जून-जुलै २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)**

**संदर्भ** :- राज्य मंडळ, पुणे यांचे क्र.रा.मं./परीक्षा-7/2092-93 दि.11/06/2025 रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जून-जुलै 2025 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर गुरुवार, दिनांक 12/06/2025 पासून School/ College login मध्ये download करण्याकरीता उपलब्ध होतील. याबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/ आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरुस्त्या असल्यास अथवा विषय/ माध्यम बदल असल्यास हॉल तिकीटच्या दोन प्रती, प्रवेशपत्रातील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र आणि प्रती दुरुस्ती शुल्क रु.200/- यासह त्वरीत विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

**विभागीय सचिवांकरिता,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

सोबत :- प्रवेशपत्रातील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र नमुना

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय :- जून–जुलै २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा जून – जुलै २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (**Hall Ticket**) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना जून–जुलै २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (**Hall Ticket**) ऑनलाईन (**Online**) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर गुरूवार दिनांक १२/०६/२०२५ रोजी **Admit Card** या **link** व्दारे **download** करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (**Hall Ticket**) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. जून – जुलै २०२५ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयांनी इ. १० वी व इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (**Hall Ticket**) ऑनलाईन (**Online**) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना **"Paid"** असे **Status** प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे **"Paid Status Admit Card"** या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व **Extra Seat No** विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे **"Extra Seat No Admit Card"** या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. **Download** केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास अथवा विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६. ज्या आवेदनपत्रांना **"Paid "** असे **Status** प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे **Status Update** होवून **"Late Paid Status Admit Card"** या **Option** व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (**Duplicate**) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी जून –जुलै २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक : ११/०६/२०२५

# प्रवेशपत्रिकेतील शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be submitted before Examination

प्रपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवसांपर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

माध्य.शाळा/क.महाविद्यालय क्रमांक | | | | | | | | | :-

## SSC/HSC Examination of Feb.-March /June- ________

Proforma indicating Errors in the Seat No. wise School-College List of Candidates

| Sr.No.<br>अ.क्र. | Application No.<br>आवेदनपत्र क्र. | Seat No.<br>बैठक क्र. | Name of Candidate<br>विद्यार्थ्याचे नाव | Original/Incorrect Position in the School-College List/ Hall Ticket<br>माध्य.शाळा-कनिष्ठ महाविद्यालय यादीतील/ प्रवेशपत्रिकावरील नोंद | Correct Position as per the School-College Record<br>माध्य.शाळा-क.महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरुस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

मुख्याध्याक/प्राचार्य

(प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.)

स्थळ -

दिनांक -